RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 Mar 2015 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 Mar 2015

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : नऊ | मार्च २०१५

अमृतवेळ (ध्यान-अभ्यासाविषयी संदेश) 4

सेवक (सत्संग) 7

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 29

भजन गाण्याचे महत्व (संदेश) 33

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

अमृतवेळ

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी ध्यान–अभ्यासाच्या कार्यक्रमाप्रारंभी प्रेमींना दिलेला एक महत्मपूर्ण संदेश, सांपला – मार्च, १९९७

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार आहे, ज्यांनी गरीब आत्म्यांवर दया करून भक्तीचे दान दिले आहे. ती भक्ती आपण शेतात उगवू शकत नाही किंवा सत्तेच्या जोरावर खरेदी करू शकत नाही. ती भक्ती आपण केवळ गुरूंच्या दयेने प्राप्त करू शकतो. भक्ती हा अनमोल हिरा आहे, उत्तम वस्तू आहे. आत्ताच प्रेमीने खूप दु:खभरीत भजन म्हटले:

मैं मेरी हटौणी पैंदी ऐ, भेटा सिर दी चढ़ौणी पैंदी ऐ,
सिक्ख नाम रखौणा, सौखा ऐ, ओ सिक्खा सिक्खी दा निभौंणा औखा ऐ,
पहलां अंदरों मैल नूं, धोणा पवे, फिर सोहणे दी याद विच, रोणा पवे,
ठंडा भरना पैंदा, हौंका ऐ, ओ सिक्खा सिक्खी दा निभौंणा औखा ऐ,

जो प्रेम प्राप्त करू इच्छितो, भक्तीची पुंजी कमावू इच्छितो, त्याच्यासाठी कमीतकमी फी म्हणजे आपले शीर कापून भेट करण्याची आहे. प्रियजनहो आपण काही आपल्या शरीरावरील शीर भौतिकदृष्ट्या कापून गुरूंना देण्याची गरज नाही व गुरूदेखील आपल्या शीराचे भुकेलेले नाहीत.

जेव्हा आपण संसारात विखुरलेले ध्यान नामस्मरणाद्वारे दोन्ही नेत्रांमागे एकाग्र करतो आणि स्थूल, सूक्ष्म व कारण हे तिन्ही पडदे बाजूस सारून पूर्णपणे तिसऱ्या तिळावर एकाग्र होतो, तेव्हा आपला ह्या शरीराशी संबंध राहत नाही. संत ह्यालास स्वत:चे शीर कापणे किंवा स्वत:चे शीर कापून गुरूंना भेट देणे म्हणतात. एखादा अडुमाडू (मृत्युस न घाबरणारा, पराक्रमी) प्रेमीच असे करू शकतो. असे करण्याविषयी बोलणे तर फार सोपे आहे. जे प्रेमी नामस्मरण व ध्यान–अभ्यास करतात त्यांना माहित आहे की मनाशी किती संघर्ष करावा लागतो. थोड्याशा संघर्षाने ध्यान तिसऱ्या तिळावर

एकाग्र होत नाही. जेव्हा आपण नामस्मरण करून तिसऱ्या तिळावर पोहचतो, तेव्हा मन पुन्हा संसारात पळते. एखादा स्वत:चे प्राण ओवाळून टाकण्यास न कचरणारा शूरवीर भक्तच मनाशी संघर्ष करून त्यास जिंकू शकतो.

प्रियजनहो, प्रेमींना भेटल्यावरच कळते, ते जेव्हा येऊन सांगतात की, मला मनाने पराजित करून वाममार्गी लावलेले आहे. आपण केलेली एक चूकच जीवनाला नीरस बनवते. जेव्हा आपण सहा महिने किंवा वर्षभर चूका करतो तर मग आपण तिसऱ्या तिळावर कसेकाय एकाग्र होऊ शकू?

प्रियजनहो, जर सैन्याच्या जनरलने लढाईच्या मैदानात जाताना असे म्हटले की माझ्याशी लढणाऱ्या शत्रूंची हत्यारे चांगली व मजबूत आहेत, जर त्यांच्याकडे ती हत्यारे नसतील तरच मी लढाईत विजय प्राप्त करू शकतो, तर काय तो जनरल लढाईत विजयप्राप्तीची आशा ठेवू शकेल का? काय तो देशाचा निष्ठावान जनरल बनू शकेल का?नाही, तो जनरल अयशस्वी ठरेल.

अशाचप्रकारे जर शिष्य म्हणाला की शत्रूच्या ताकदी काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार फार प्रबळ आहेत. जर ह्या ताकदी नसतील तर मी विजयी होऊ शकेन, तर शिष्य कसा यशस्वी होऊ शकेल? जर आपण रोज-रोज चिखलात माखत राहिलो तर आपण आपल्या गुरूंशी निष्ठावान बनू शकू का? आपले शीर गुरूंना भेट देण्याची आशा करू शकतो का?

प्रियजनहो, आपले लढाईचे मैदान तिसरा तिळ आहे. सतगुरूंनी शब्द-धुन देऊन आपल्याला सुसज्ज केलेले आहे. सतगुरू असेही म्हणत नाहीत की तू एकटा जा. ते सदैव आपल्या सोबत असतात. परंतु लढाई करणे तर जनरलचेच काम असते. शिष्याने पुढे सरून मजबूत व दृढप्रतिज्ञ होऊन उभे राहणे गरजेचे आहे, गुरूतर त्याच्या पाठीशीच आहेत. जर जनरल लढाईच्या मैदानात आपल्या मालकाची आज्ञा मानून गेला, तर मागून त्याच्या गरजेचे सामान पोहचवणे हे हैडक्वार्टर वाल्यांचे व मालकाचे काम असते.



प्रिय मुलांनो, गुरू केवळ देहरूपच नसतात, ते आपल्याला केवळ पाच अक्षरेच सांगत नाहीत. जेव्हा ते देहरूपात उपस्थित असतात तेव्हा ते आपल्या अंतर्यात उत्साह व तळमळ निर्माण करतात. आपले भयानक शत्रू आपली अध्यात्मिक जमापूंजी लुटतात, गुरू आपणांस त्यांपासून सावध करतात. जेव्हा आपण गुरूंच्या शिकवणीवर पूर्णपणे अमल करून तिसऱ्या तिळावर जातो, सूक्ष्म देशात जातो, तेव्हा ते सूक्ष्म रूप धारण करतात, जेव्हा आपण कारण देशात जातो, तेव्हा ते कारण रूप धारण करतात. जेव्हा आपण पारब्रह्मात जातो तेव्हा तेथे सार–शब्द आहे.

ज्या तऱ्हेने आपण अंतर्यात प्रगती करत जातो सतगुरू तेच स्वरूप धारण करून आपली मदत करतात, आपली पाठ राखतात. सतगुरू प्रत्येकवेळी आपल्या सोबत असतात. सत्य हे आहे की ते सावलीप्रमाणे एक सेकंद सुद्धा सेवकापासून दूर होत नाहीत. डोळे बंद करून आपले नामस्मरण सुरू करा.

***

सेवक

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, सूफीसंत शेख फरीद साहेबांची वाणी
मुंबई, महाराष्ट्र – १२ जानेवारी १९८७

ही फुलबाग कर्ते–करविते विश्वेश्वर महाराज सावनजींची आहे. ते आम्हांस नेहमीच स्वत:चे अनुभव सांगत असत. सर्व संतांचे जीवन स्वानुभवाने भरलेले असते. गुरु नानकदेवजी म्हणत असत,''संताकडून तेच फायदा घेऊ शकतात जे त्यांनी दिलेल्या शिकवणीवर श्रद्धा–विश्वास ठेवून त्यांच्या सांगण्यानुसार चालतात. नि:संदेह आपण बाह्यजगाच्या दृष्टीने पाहिल्यास आपल्याला नुकसानच दिसते, परंतु त्यामागे बरेच काही दडलेले असते.''

महाराज सावन सिंहजी सांगत असत की, प्रत्येक मनुष्य परमार्थाच्या गोष्टी करतो, परंतु परमार्थ हा गोष्टी सांगण्याचा (कथनाचा) विषय नाही, स्वत: नामाची साधना करण्याचा(करणीचा) विषय आहे. आपण एका म्हाताऱ्या बाईचे उदाहरण देत असत की तिची मुलगी आजारी झाली. ती म्हातारी नेहमीच परमेश्वरासमोर प्रार्थना करायची की, मी संसारात सर्व काही पाहिले आहे, मृत्यु आला तर मला येऊ दे. ही मुलगी ठीक होऊ दे.

परमेश्वर सर्वव्यापी आहे, तो पाहतो की, जीव काय करत आहे? एके दिवशी त्यांच्या घरी एक गाय आली व खाण्यास काही मिळावे या आशेने इथेतिथे पाहू लागली. तिथे एक हंडा ठेवलेला होता, जो चुलीवर ठेवून ठेवून खालच्या बाजूनी काळा झाला होता. गाईने खाण्यासाठी त्या हंड्यात आपले तोंड घातले तेव्हा तिचे तोंड व शिंगे त्यात अडकली. गाय घाबरून इथेतिथे पळू लागली. आता ना गाईचे तोंड दिसत होते ना तिची शिंगं दिसत होती.

म्हाताऱ्या बाईस वाटले की, ज्या मृत्युदेवतेस मी रोज विनंती करते की माझ्या मुली ऐवजी मला घेऊन चल, कदाचित तो मृत्युदेव हाच असावा. लागलीच त्या म्हाताऱ्या बाईने घाबरून म्हटले,''आजारी मुलगी त्या बाजूला

आहे, मी तर म्हातारी आहे.'' आपण परमार्थाच्या गोष्टी तर खूप करतो, पण त्यावर अमल करत नाही, म्हणून आपण त्यात नापास होतो.

स्यालकोटमध्ये एक हमजागोश नामक मुसलमान फकीर राहात असे. तो चांगला जपतप करणारा होता व त्यास रिद्धि-सिद्धि प्राप्त होत्या. तेथे एक सावकारदेखील राहात असे, त्याच्याकडे खूप धनसंपत्ती होती, पण त्याला मुलबाळ नव्हते. आपण संसारिक लोक घरात मुल नसल्यास घर रिकामे समजतो. त्या सावकाराने हमजागोश फकीराची छान सेवा केली. फकीर म्हणाला, ''तुझ्या घरात चार मुलगे जन्माला येतील, परंतु त्यातून तू एक मुलगा मला परमार्थासाठी दे.''

आपणांस वाटते की फकीरांच्या अशा बोलण्याने काय होते? ते उगाचच अशा गोष्टी सांगून घाबरवितात. परंतु सत्यस्थिती वेगळी असते. हे तर आपापल्या श्रद्धेवर निर्भर असते. काही काळानंतर सावकाराच्या घरी चार मुलांचा जन्म झाला. मुलं मोठी झाली परंतु सावकाराने हमजागोश फकीराला परमार्थासाठी एकही मुलगा दिला नाही. शेवटी त्या फकीराने सावकाराला बोलावून म्हटले की तू जे वचन मला दिले होतेस, ते पूर्ण कर. एक मुलगा मला दे. सावकार बरीच वर्षे ते टाळत राहिला, शेवटी एके दिवशी म्हणू लागला, ''आम्ही हिंदू आहोत, तुम्ही मुसलमान आहात. जर मी तुम्हाला आपला मुलगा दिला तर लोक माझी निंदा-नालस्ती करतील.''

रिद्धी-सिद्धि प्राप्त असलेले फकीर लगेच शाप देतात. तो फकीर म्हणाला की, ''हा सर्व गावच खोटे बोलणाऱ्या लोकांचा आहे. जोपर्यंत ह्या गावाचा विनाश होत नाही, तोपर्यंत मी अन्न-पाणी खाणार नाही.''

ज्याकाळी गुरू नानकदेवजी संसारात आले, त्याकाळी रिद्धि-सिद्धि प्राप्त असलेले बरेच फकीर असत. गुरू नानकदेवजींनी अशा फकीरांना योग्य मार्गी आणले. गुरू नानकदेवजी बाला व मर्दानाला घेऊन स्यालकोटला गेले. तेथे ते हमजागोशला भेटले असता त्यास म्हणाले,''फकीरांमध्ये दया

असली पाहिजे.'' हमजागोश म्हणाला,''मी तेव्हाच अन्न-पाणी खाईन जेव्हा हे पूर्ण गाव नष्ट होईल. यांना मारल्याखेरीज मी उठणार नाही.''

गुरू नानकदेवजी म्हणाले, ''या गावातील लोकांनी तर अगोदरच मरण कबूल केलेले आहे, तू मेलेल्यांना का मारू पाहतोस?'' हमजागोश म्हणाला, ''माझे समाधान कसे होईल?'' त्याचे समाधान करण्यासाठी गुरू नानक देवजींनी मर्दानाला सोन्याची दोन नाणी देऊन म्हटले, ''तू शहरातून खरे आणि खोटे यांचा सौदा करून ये.'' मर्दाना शहरातील प्रत्येक दुकानात खरे व खोट्याचा सौदा घेण्यासाठी गेला. फिरता-फिरता शेवटी मूला खत्री नामक एका चांगल्या व्यापाऱ्याकडे पोहचला. मूला खात्रीने मर्दानाकडून ती सोन्याची दोन नाणी घेऊन एका कागदावर लिहून दिले की,'मरणे खरे आहे' व दुसऱ्या कागदावर लिहून दिले की 'जगणे खोटे आहे.' मर्दाना दोन्ही कागद घेऊन गुरू नानकदेवजींकडे आला. गुरू नानक देवजींनी ते कागद हमजागोशला दाखविले व म्हटले,''बघ मित्रा, या गावात अशी लोकं आहेत जी मरणे खरे आहे व जगणे खोटे आहे असे समजतात. त्यांनी तर अगोदरच मरणे कबूल केले आहे. तू अजून त्यांना काय मारशील?''

गुरू नानक देवजींनी विचार केला, मूला खत्रीने तत्त्वज्ञानात्मक शब्द तर खूप उच्च लिहून दिले आहेत, चला जाऊन पाहूया की तो स्वत: ह्या तत्त्वावर अमल करतो का? ते त्यास म्हणाले, ''प्रिय मित्रा, तू जे लिहिले आहेस जर त्या गोष्टीवर तू अमल करीत असलास व तुझा त्यावर विश्वास असला, तर आम्ही तुझ्या चरणाचे चुंबन घेण्यास तयार आहोत.'' मूला खत्री म्हणाला, ''माझा त्यावर विश्वास नाही, मी तर पैशासाठी खोटे बोललो. जर आपण मला याबद्दल समजावू शकलात तर मी तुमच्या शरणी येईन.''

मूला खत्रीने काही दिवस गुरू नानकदेवजींची खूप सेवा केली व त्यांना प्रसन्न केले. जेव्हा गुरू नानकदेवजी स्यालकोटमधून प्रस्थान करू लागले तेव्हा आपण मूला खत्रीला म्हणालात, ''आम्ही तुला आमचा प्रतिनिधी

नेमतो, जो परमार्थाचा इच्छुक येईल तू त्याला नामदान दे. आम्ही त्याचा सांभाळ करू.'' मूला खत्री म्हणाला,''मी आपल्याशिवाय राहूच शकत नाही. आता आपण माझे सर्वस्व (जीवनआधार) बनला आहात.''

गुरू नानकदेवजी म्हणाले,''नाही. तुझी पत्नी आहे, तुझी मुलं आहेत. तुला घरी राहून स्वत:च्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्या पाहिजेत.'' मूला खत्री म्हणाला,''मी नीट विचार केलेला आहे, मी आपल्याशिवाय नाही राहू शकत.'' असे म्हणून तो आपल्यासोबत निघाला. जेव्हा थोडेसे पुढे गेले तेव्हा गुरू नानकदेवजी मूला खत्रीला म्हणाले की, तुझ्या बायकोच्या हातात एक नारळ आहे आणि ती जळून भस्म होण्यासाठी आगीत उडी मारण्याच्या तयारीत आहे, जर तू लवकर पोहचू शकत असशील तर पोहच. ज्याच्याशी तुझे शत्रुत्व होते व ज्याला तू सज्जन मनुष्य समजत होतास, त्यानेच ही गोष्ट तुझ्या बायकोला शिकवली आहे. हे ऐकताच मूला सतगुरूंच्या प्रेमाला विसरला व म्हणू लागला, ''मला लवकर घरी पोहचवा, माझी बायकोच माझा जीवनआधार आहे.'' घरी येऊन तो बायकोच्या जवळ बसला.

काही वेळाने गुरू नानकदेवजी बाला आणि मर्दानाला सोबत घेऊन मूलाच्या पाठी गेले. त्यांनी त्याच्या घराखाली उभे राहून हाक मारली, ''मूला बाहेर ये!'' त्याच्या बायकोने वरून पाहून म्हटले की,''ते तीन फकीर तुला घेऊन जाण्यासाठी आले आहेत.'' मूला म्हणाला, ''आता मी काय करू? ते मला घेऊन जातील.'' त्याची बायको त्याला म्हणाली, ''गोठ्यातील गाई बाहेर चरायला गेल्या आहेत, तेव्हा तू गोठ्यात जाऊन लपून बस. मी त्यांना सांगेन की, तो तर आपल्या सोबतच गेला होता, परत आलाच नाही.'' जेव्हा पुन्हा गुरू नानकदेवजींनी हाक मारली तेव्हा मूलाच्या बायकोने बाहेर येऊन तेच सांगितले. तिथले गावकरी देखील जमा झाले. गावकरी म्हणू लागले, आम्ही तर थोड्या वेळा पूर्वी मूलाला इथेच बघितले होते. त्यावेळी गुरू नानकदेवजींनी या पंक्ती उच्चारल्या :

नाल कराड़ा दोस्ती, कूड़ो कूड़ी पाए।
मरन न जाणें मूलया आया कित्थे खाए।।

गुरू नानक देवजी म्हणाले,''अरे मूला, तू आमची फसवणूक करतोस, तुला तर हे पण माहीत नाही की, तुझा मृत्यू कुठे येणार आहे?'' गोठ्यात साप निघाला आणि त्याने मूलाला डंक मारला. ही गोष्ट सर्व गावात पसरली की संताना घाबरून मूला घरी आला, त्याला सापाने डंक मारला व त्याचा मृत्यू झाला. मग मूला सशाच्या योनीत आला.

जेव्हा गुरू गोविंद सिंहजी महाराज दक्षिण प्रांतात गेले, तेथे त्यांनी त्या सशाची शिकार केली. जेव्हा त्यांचा ससाणा त्या सशाला खात होता, त्यावेळी गुरू गोविंद सिंहजी महाराज हसत होते. आज त्यांच्या आठवणीत तेथे गुरुद्वारादेखील बनविलेला आहे. तेथे एक वैष्णवी विचारांचा माणूस आला. त्याला कोणीतरी सांगितले की, हे पूर्ण गुरू आहेत, यांच्याकडून नाम घे, तुझा फायदा होईल. परंतु त्या माणसाच्या मनात अभाव निर्माण झाला की हे कसे गुरू आहेत, यांचा ससाणा जिवंत जनावरांना खात आहे आणि हे बसून हसत आहेत. ही सर्व संतांची मौज असते. गुरू साहेबांनी त्या प्रेमीस म्हटले की, तुला या रहस्याचे ज्ञान नाही. हा ससा आमच्या मोठ्या गुरूंचा **सेवक** होता. ह्याला सहन करण्याची सवय होती, म्हणून हा सशाच्या योनीत आला. अशा गोष्टी प्रचलित यासाठी होतात की संत महात्मा प्रेमाने त्या सत्संगात सांगतात अथवा गोष्टीरूपात लिहून जातात, जेणेकरून सत्संगात येणाऱ्या लोकांना त्या गोष्टीचा समज पडावा.

याचप्रमाणे सावन सिंहजी महाराज एक दिवस संगतला फार प्रेमाने समजवत होते की, गुरू गोविंद सिंहजींचा दिवाण (सत्संग) लागला होता. गुरु गोविंद सिंहजी शिष्यत्वाविषयी सांगत होते की, गुरुंचा खरा **सेवक** दुर्मिळ असतो. साधारणपणे कोणी बायकोचा **सेवक** असतो, कोणी मुलाबाळांचा **सेवक** असतो, तर कोणी धन-संपत्तीचा **सेवक** असतो. इतक्यात एक

सेवक उठून म्हणाला, ''महाराजजी, मी तर आपलाच **सेवक** आहे.'' गुरू महाराजांनी त्यास समजावले परंतु त्याने ते मान्य केले नाही. शेवटी गुरू महाराज त्याला म्हणाले की,''आमच्यासाठी असा कपड्याचा ठाण (तागा) घेऊन ये ज्यासारखा पूर्ण शहरात दुसरा ठाण नसावा.''

त्याच्या मनात विचार आला की माझ्याकडे खूप पैसा आहे, मी असे बरेच कपड्याचे ठाण घेऊन जाऊ शकतो. शेवटी तो **सेवक** एक कापडाचा ठाण विकत घेऊन घरी आला. त्याच्या बायकोने तो कपड्याचा ठाण पाहून विचारले की,''तू हा ठाण कोणासाठी आणला आहेस?'' **सेवक** म्हणाला, ''हा ठाण मी गुरू साहेबांसाठी विकत घेऊन आलो आहे.'' त्याची बायको म्हणाली,''हा कपडा तर मला आवडला.'' सेवकाने आपल्या बायकोस खूप समजावण्याचा प्रयत्न केला की,''कपड्याचा असा ठाण बाजारात दुसरा नाही. तेव्हा मी तुझ्यासाठी निराळा ठाण आणून देईन.'' परंतु त्याच्या बायकोने मान्य केले नाही. ती म्हणाली,''मला हाच कपडा आवडलेला आहे तेव्हा हाच ठाण मला हवा. तू गुरू साहेबांना सांग की मला अजून असा अद्वितीय ठाण सापडलेला नाही, मी अजूनही असा ठाण शोधत आहे.'' **सेवक** आपल्या बायकोला म्हणाला,''मी त्यांना असे कसे सांगू शकतो, ते तर अंतर्यामी आहेत.'' तिने हट्ट धरला व म्हणाली,''मला ते काही ठाऊक नाही, मला हा कपडा आवडलेला आहे तेव्हा मी काही तो सोडणार नाही.''

त्या सेवकास सत्संगाची ओढ असल्याने तो **सेवक** गुरूसाहेबांकडे गेला, सोबत त्याची बायको सुद्धा होती. गुरू साहेबांनी त्यास विचारले, ''काय तू कपड्याचा ठाण आणलास?'' तेव्हा **सेवक** टाळाटाळ करू लागला व म्हणू लागला, ''माझे प्रयत्न चालू आहेत, मला अजून असा कपडा सापडलेला नाही.'' त्याची बायको त्याच्या पाठीच उभी होती, तिने तो ठाण आपल्या बगलात लपवून आणला होता. तिने तो ठाण काढून गुरू साहेबांपुढे ठेवला व म्हणाली,''महाराजजी, हा आपला **सेवक** नाही, माझा **सेवक** आहे.''

श्रृंगी ऋषी अरण्यात जन्माला आले व त्यांचे संपूर्ण जीवन अरण्यातच व्यतीत झाले. ते कधीही शहरात आले नव्हते. परंतु जेव्हा मनाशी संघर्ष करण्याची पाळी आली, मनात थोडीशी काम–वासनेची लहर उफाळून आली तेव्हा त्यांनी तेरा मुले जन्माला घातली.

महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की, आपणा सर्वांच्या जीवनात अशा घटना घडतात. आमचे पाठीजीदेखील आपल्या एका प्रिय स्नेहीची स्तुती करीत असत की आम्ही पंचवीस–सव्वीस वर्षांपासून एकत्र राहात आहोत, आमच्यात तर अनेक दोष व उणीवा आहेत, परंतु हा प्रेमी दृढप्रतिज्ञ व दृढनिश्चयी आहे. यास भक्ती करण्याची संधी मिळाल्यास तो खूप भक्ती करू शकेल. तो नामदान घेण्यापूर्वी देखील अनेकदा घर सोडून जात असे व पाठीजी त्यास परत घरी आणत असत.

तो प्रेमी तेरा वर्षे मला विनंती करीत राहिला की मी आपल्याकडे राहू इच्छितो, आपणच माझ्यासाठी सर्वकाही आहात. शेवटी मी विवश झालो, माझ्या हृदयात माझ्या गुरुदेवांनी विचार आणला की यास परमार्थात आणावे. मी त्यास म्हटले की, तू आपल्या मुला–मुलींची जबाबदारी पार पाड मग तुझी इच्छा पूर्ण होईल. माझ्या गुरुदेव कृपालजींनी त्याच्या चार मुलींची व दोन मुलांची जबाबदारी स्वत:वर घेतली व सर्व कार्य पूर्ण करविले. मग तो पुन्हा म्हणाला,''मी आपल्याकडे राहू इच्छितो.'' मी त्यास पुन्हा समजावले की तू आपल्या स्वत:च्या घरी राहून आपल्या पत्नीवर व मुलांवर प्रेम कर, तेव्हा तो म्हणू लागला,''मी तर आपल्याशिवाय राहूच शकत नाही.''

एके दिवशी त्याची पत्नी व मुले त्यास माझ्याकडे सोडण्यासाठी घेऊन आले व म्हणाले की,''आता त्याने आपल्याकडे राहून भक्ती करावी, आम्हास खूप आनंद होईल.'' तो काही दिवस तर इथे राहिला. परमेश्वर सर्वांना अनुभव करवून देतो. काही दिवसांनी त्याच्या पत्नीने विचार केला की जाऊन पाहूया तरी की हा किती पाण्यात आहे? जेव्हा त्याच्या पत्नीने

प्रेमभरीत नजरेने त्याच्याकडे पाहिले तेव्हा तो उदास झाला, जसे श्रृंगी व पारासुर ऋषी देखील विरघळून गेले होते. पाठीजींनी मला म्हटले, आपण यास सुट्टी द्यावी. त्यांनी असा देखील इशारा दिला की हा एखाद्या दुसऱ्या दिशेला जाऊ नये. मी त्यास एका माणसासोबत मोटर सायकलवर घरी परत पाठविले की यास याच्या घरापर्यंत सोडून ये. कबीर साहेब सांगतात:

कबीरा ऐह मन मशकरा, कहूँ तो माने रोश।
जे पेंडे साहिब मिले, तबही न चले कोश।।

हे मन प्रत्येकाची थट्टा करते. आपण ऋषीमुनींच्या कथा ऐकतो, परंतु असे आपल्या स्वत:च्या बाबतीतदेखील घडते. तो मनुष्य घरी निघून गेला परंतु घरी जाऊनही तो अस्वस्थ होता, कारण त्याच्या मनाचा एक भाग त्यास हे देखील सांगत होता की तू दुष्कर्म केलेस. तो घरी जाऊन असा काही चेहरा करून बसला होता, जसा पर्वतावर लपलेला चोर पकडला जातो, कारण त्यास पळण्यासाठी जागाच शिल्लक राहात नाही.

जीव कडुलिंबाच्या झाडास पाणी घालत असतो व त्यापासून गोड साखर चाखावी अशी इच्छा करतो. पाठीजींनी मेहरबानी करून त्यास पुन्हा घेऊन आले. तो मला म्हणाला, ''ही माझ्या आवाक्यातील गोष्ट नाही. माझी पत्नी माझ्यावर खूप प्रेम करते.'' मी म्हटले, ''मी तीस वर्षांपासून पाहत आहे की तुम्ही दोघे एकमेकांचा चेहरादेखील पाहू इच्छित नाहीत. जर ही बाई तुझ्यावर प्रेम करते तर मग ती कोणावर द्वेष करते?''

मी त्यास सांगितले, ''प्रिय शिष्या, आता नीट विचार करून निर्णय घे. माझ्या गुरूदेव कृपालजींनी बारा–चौदा दिवस बसून नीट विचार केला होता की मी काय करावे? व्यवसाय करावा की नाही? शेवटी त्यांनी हेच ठरवले की आधी परमेश्वरास प्राधान्य द्यावे व संसारीक कामे नंतर.''

मी देखील माझ्या जीवनवृत्तांतात सांगितले आहे की मला घर सोडण्यास तीन वर्षे लागली. मी खूप बारकाईने विचार केला की, घर सोडल्यास

कोणकोणत्या अडी-अडचणी येतील? जरी आपण भक्ती केली तरी मन पाठ सोडत नाही. ते इंद्रियांमार्फत त्याची हत्यारे आपल्या भोवती सुसज्ज ठेवते. एकदा का लढाईच्या मैदानात पाऊल ठेवले की मग मागे सरणे चांगले नसते. कबीर साहेब सांगतात:

जे गृह करे तां धर्म कर नहीं ता कर वैराग।
वैरागी होय बंधन पड़े ताके बड़ो अभाग।।

फरीद साहेबांची एका पठाणाशी मैत्री होती. जेव्हा फरीद साहेब तप-अभ्यास करू लागले तेव्हा त्या पठाणाने विचार केला की आता यांच्यासोबत आपले दाणा-पाणी पूर्ण झाले आहे, तेव्हा आपण यांस एखाद्या निराळ्या मार्गाने का भ्रमात पाडू नये? काळ देखील एक अत्यंत प्रबळ शक्ती आहे. जेव्हा त्या शक्तीचा सामना करावा लागतो, तेव्हा ती आपणांस अयशस्वी बनविते. काळाने त्या पठाणाच्या अंतरात बसून त्यास सल्ला दिला की आज फरीद साहेबांना भोजनासाठी आमंत्रण द्यावे. पठाणाने मेजवानी सोबत चांगल्या नाच-गाण्याची व्यवस्थादेखील केली की जेव्हा फरीद हे सर्व पाहिल तेव्हा त्याचे मन विरघळेल, परंतु फरीद साहेब तर अंतर्यातून शब्दनामाशी एकरंग झालेले होते. ते सर्व पाहून फरीद साहेब त्यास म्हणाले:

ऐ विस गंदलां घरीआं खंड लिवाड़।
इक राहें दे रह गए इक राधी गए उजाड़।।

हे बघ पठाणा, जू ज्या बायका माझ्यासमोर नाचवत आहेस, त्या सर्व मलिनतेने भरलेल्या आहेत. हे विषाचे मलिन पदार्थ आहेत, ज्यावर साखरेचा लेप चढवलेला आहे. प्रिय मित्रा, माझा जो धर्म होता तो मी तुला सांगितलेला आहे. काळाने जीवांची फसवणूक करण्यासाठी मनुष्यांस बाहेरून आकर्षीत बनविलेले आहे, परंतु त्यात विष भरलेले आहे. जो यांस खाईल त्याची दुर्दशा होईल. जेव्हा प्रभू रामचंद्राचे गुरूदेव त्यास शिकवण देत होते, तेव्हा त्यांनी हेच सांगितले:

थैला ऐह गंदगी दुर्गंधी स्थान। बिष्टा ही इसमें भरा और न कुछ भी जान।।

स्त्री असो वा पुरुष असो, सर्वांना एकसमान इंद्रिये लागलेली आहेत. या इंद्रियांमधून एकाच प्रकारचे पदार्थ निघतात. डोळे, नाक आणि कान यांमधून मळ निघतो, याचप्रमाणे खालची इंद्रियेदेखील मळाने भरलेली आहेत. तू यापासून सावध राहा, यामध्ये फसू नकोस.

फरीदा ए विस गंदलां धरीआं खंड लिवाड़।
इक राहेंदे रह गए इक राधी गए उजाड़।।
फरीदा चार गवाया हंढ कै चार गवाया संम।।
लेखा रब मंगेसीआ तू आंहो केह्रे कंम।।

फरीद साहेब सांगतात,''प्रिय मित्रा, कोण साखरपुडा करून संसारातून निघून जातो तर कोण लग्न करून निघून जातो. कोणाची पत्नी निघून जाते तर कोणाचा पती निघून जातो. सांगताना खेद वाटतो की तू दिवसातील चार प्रहर संसारीक कामं करण्यात व्यतीत केलेस व चार प्रहर झोपून व्यतीत केलेस, परंतु जेव्हा परमात्मा श्वासा-श्वासाचा हिशोब मागेल तेव्हा तू काय उत्तर देशील? कधी परमात्म्याचे स्मरण केलेस का? ध्यान-अभ्यास केलास? तू रात्रंदिवस दुष्कर्म करतोस व वाईट गोष्टींचाच विचार करतोस.''

फरीदा दर दरवाजै जाय कै क्यों डिठो घड़ीआल।।
एह निदोसां मारीऐ हम दोसां दा क्या हाल।।

फरीद साहेब एके दिवशी राजदरबारात गेले; सर्वसाधारणपणे तेथे जागोजागी मोठ्या घंटा ठेवलेल्या असतात. तो घंटा पितळेचा असो वा लोखंडाचा असो, दर अर्ध्या तासाने तो घंटा वाजविण्यासाठी त्यावर मार पडतो. दुपारनंतर तर त्यावर खूपच मार पडतो. त्या घंटांनी काय गुन्हा केलेला असतो? खरेतर आपण गुन्हे व अपराधांनी भरलेलो असतो. जर अपराध केला नसतानाही त्या घंटांना इतका मार पडतो, आपण तर इतकी पापं आणि दुष्कर्म केलेली असतात, तर मग आपली त्या परमेश्वराच्या

दरबारात काय दुर्दशा होईल? त्या घंटांची जशी दुर्दशा होते,दोशांनी भरलेल्या जीवांची देखील पुढे जाऊन तशीच दुर्दशा होते, येथे यमदूत त्यास पिटतात.

घड़ीए घड़ीए मारीए पहरी लहै सजाय।।
सो हेड़ा घड़ीआल ज्यों डुखी रैण विहाय।।
बुड्ढा होआ सेख फरीद कंबण लग्गी देह।।
जे सौ वरयां जीवणा भी तन होसी खेह।।

एका थरथरणाऱ्या वयोवृद्ध मनुष्याने फरीद साहेबांकडे जाऊन म्हटले, मी वृद्ध झालेलो आहे, तेव्हा मला एखादे औषध द्या ज्यामुळे मी पुन्हा तरुण होऊ शकेन. त्यावेळी हिवाळादेखील नव्हता. थंडी पडली नसतानाही तो थंडीने थरथर कापत होता. आपणांस माहित आहे की, वयोवृद्ध मनुष्याचा देह थरथरू लागतो, ही त्याच्या आवाक्याबाहेरील गोष्ट असते. परंतु तरीही त्याचे मन आतून सांगत असते की, आपण दीर्घायुषी व्हावे, कोणत्या ना कोणत्या मार्गाने आपणांस तारुण्य परत लाभावे. आपणांस माहीत आहे की एकदा का तारूण्य हातून निघून गेले, तर वार्धक्य येतेच.

फरीद साहेब त्या वयोवृद्ध मनुष्यास म्हणाले, ''हे बघ प्रिय मित्रा, आता तुझा अंतसमय निकट आलेला आहे, तुझा देह थरथर कापू लागलेला आहे, तुला अजून शंभर वर्षांचे आयुष्य जरी लाभले तरीही शेवटी तुझा देह कबरीत जाऊन मातीत मिळून मातीच बनून जाईल.''

फरीदा बार पराइऐ बेसणा सांई मुझै न देह।।
जे तू एवैं रखसी जीउ सरीरों लेह।।

फरीद साहेब त्या वयोवृद्ध मनुष्याचा उल्लेख करीत आपल्या गुरुंकडे विनंती करतात की हे गुरु परमात्मा, तुम्ही मला परक्या दरवाजात बसवू नका. जर तुम्हांस मला असेच परक्या उंबरठ्यावर बसवून तळमळत ठेवायचे असेल तर त्यापेक्षा हेच उत्तम होईल की तुम्ही माझ्या देहातून या जीवात्म्यास

काढून घ्या की जेणेकरून माझे शरीर सुटावे. परके द्वार, परका उंबरठा कोणता आहे? या जन्म-मरणाच्या संसारास परके द्वार, परका उंबरठा म्हणून संबोधले आहे. गुरु नानाकदेवर्जीनी देखील यास परका उंबरठा म्हणून संबोधले आहे. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

जो घर छड गवावणा सो लग्गा मन माहे।
जित्थे जाए तुम वरतना तिसकी चिंता नाहे।।

महात्मा सांगतात की आपण इथून एके दिवशी अंथरूण झाडून निघून जाणार आहोत. आपल्या हृदयात इथले घर सामावलेले आहे, परंतु आपणांस खऱ्या अर्थाने ज्या घरी जावयाचे आहे, त्या घराची आपणांस चिंता नाही.

कंध कुहाड़ा सिर घड़ा वण कै सर लोहार।
फरीदा हौं लोड़ी सौह आपणा तू लोड़ह अंगयार।।

जस्सा लोहार फरीद साहेबांचा मित्र होता. तो नेहमी फरीद साहेबांच्या तपस्थानातून लाकडे तोडून नेत असे. एके दिवशी त्याने आपल्या डोक्यावर पाण्याचा घडा व खांद्यावर लाकूड तोडण्याची कुऱ्हाड ठेवली होती. फरीद साहेब बसून-बसून तप करून थकले होते, म्हणून ते एका झाडाच्या आधारे उभे राहून तप करू लागले की जेणेकरून झोप येऊ नये. तप करीत करीत त्यांचे शरीर देखील सुक्या लाकडासारखे दुबळे झाले होते.

जस्सा लोहाराची दृष्टी कमजोर झालेली होती. त्याने फरीद साहेबांना झाडाचे लाकूड समजून कुऱ्हाडीचा दस्ता मारून पाहिला की लाकूड ठीक आहे का? त्यामुळे फरीद साहेबांची समाधी सुटली. फरीद साहेब त्यास म्हणाले, ''प्रिय मित्रा, तुझ्या डोक्यावर घडा व खांद्यावर कुऱ्हाड आहे, मी परमात्म्याची भक्ती करीत आहे, त्यास भेटू इच्छितो आणि तू माझ्यावर कुऱ्हाडीचा घाव घालू इच्छितोस. तू माझा कशा प्रकारचा मित्र आहेस?''

फरीदा इकना आटा अगला इकना नाहीं लोण।
अग्गै गए सिंञापसन चोटां खासी कौण।।

आता फरीद साहेब जस्सा लोहारास सांगतात की,''काहींकडे भरपूर गव्हाचे पीठ आहे तर काहींकडे भाजीत घालण्यासाठी मीठदेखील नाही. असे लोक भूक लागल्यास काय खातील? त्याचप्रमाणे काही खूप जास्त ध्यान-अभ्यास करून आपली पारमार्थिक जमापुंजी गोळा करतात आणि काहींकडे मीठाइतका देखील ध्यान-अभ्यास नसतो. पुढे गेल्यावर परमात्मा हिशोब मागतो, तेथे कोण मार खाईल? आपण जाणतो की, जेव्हा पोलीस चोराची दुर्दशा करतात तेव्हा तेथे त्यास सहानुभूती दर्शविणारा कोणीही नसतो. तू रोज माझ्याकडे येतोस, तू जप-तप कर. परमेश्वरास काय उत्तर देशील?'' गुरु नानकदेवजी सांगतात:

बह लेखा कर समझाया।।

आपण सांगता, ''तेथे जीवास हिशोब करून समजावले जाते की ही सर्व तू स्वत: केलेली दुष्कर्म आहेत, आता तू त्यांचे फळ भोग.''

पास दमामे छत सिर भेरी सडो रड।

जाय सुत्ते जीराण मह थीए अतीमा गड।।

फरीद साहेब एका राजाचा मृत्यू पाहून सांगतात की एक राजा मृत्यू पावला तेव्हा तो आपले सर्व महाल, राजवाडे व मालमत्ता जशीच्यातशी सोडून निघून गेला. एक अशीदेखील वेळ होती जेव्हा राजाच्या द्वारी तमाशगीर लोकं ढोल, ताशे व वाजंत्री वाजवत असत. मी स्वत: पंजाब प्रांतात पाहिले आहे की, राजांच्या दरवाजात सायंकाळी दोन-तीन तास तमाशगीर लोक वाद्य-वाजंत्री वाजवून राजा-महाराजांचे मनोरंजन करीत असत व राजांकडून चांगला पगार व बक्षिसे प्राप्त करीत असत.

फरीद साहेब सांगतात आज राजा मरण पावला, त्यास एका अनाथ व निराश्रीत मनुष्याप्रमाणे कबरीत ठेवले गेलेले आहे. आता तेथे एखादी पीपाणी किंवा बाजादेखील वाजत नाही. महालात देखील शुकशुकाट पसरलेला आहे. तो राजा सर्वकाही इथेच सोडून गेला.

फरीदा कोठे मंडप माड़ीआं उसारे दे भी गए।।
कूड़ा सौदा कर गए गोरीं आय पए।।

फरीद साहेब अत्यंत प्रेमाने सांगतात की, आज हे उंच-उंच महाल व राजवाडे बनविणारे कारागीर राहिले नाहीत. जे व्यक्ती त्यांत राहतात व आज त्यांस माझा महाल, माझा राजवाडा म्हणतात, ते देखील राहाणार नाहीत. या गोष्टींचा अहंकार करणे म्हणजे उकिरड्याचा (व्यर्थ) सौदा करण्याप्रमाणे आहे, सर्व चार दिवस भोग भोगून निघून जातील.

संत-महात्मा आपणांस परमात्म्याशी जोडण्यासाठी येतात, संसारिक मालमत्तेशी जोडण्यासाठी येत नाहीत. महाराजजी सांगत असत, ''हे शरीर देखील परके आहे, भाड्यावर घेतलेले घर आहे.'' जेव्हा हे शरीर देखील सोबत जाणार नाही तर काय आपण धन-संपत्ती सोबत घेऊन जाऊ शकू?

वेद-व्यास एका स्त्रीचे रूप धारण करून जेमिनी ऋषीची परीक्षा घेण्यासाठी रात्री त्यांच्याकडे गेले. जेमिनी ऋषींनी अगोदर तिला राहाण्यासाठी आपली झोपडी देऊन स्वत: बाहेर आले व तिला आतून कडी लावण्यास सांगितली. नंतर जेमिनी ऋषी तिला म्हणाले की ही झोपडी माझी आहे, तू कब्जा करून बसली आहेस? दरवाजा उघड. तेव्हा वेद-व्यासजींनी जेमिनी ऋषींना म्हटले की, तू इतके चांगले पुस्तक लिहिले आहेस परंतु खेद वाटतो, आजपर्यंत कोणी या धरणीचा व मायेचा मालक बनला आहे का?

महात्मा आपणांस समजावतात की, या गोष्टींचा कोणीही मालक नसतो. आपले वाडवडील (पूर्वज) या सर्व गोष्टींची उल्टी करून त्या इथेच सोडून निघून गेले व आपण ती चाटण्यात मग्न आहोत. या धन-संपत्तीने, महाल-वाड्यांनी आपल्या पूर्वजांची साथ दिली नाही तर आपण काय आशा धरून बसलो आहोत.

फरीदा खिंथड़ मेखां अगलीआं जिंद न काई मेख।।
वारी आपो आपणी चले मसायक सेख।।

एक फकीर जंगलात आपली गोधडी शिवत बसला होता. त्याचा असा समज होता की जुने व फाटके कपडे परिधान केल्याने परमात्मा प्राप्त होतो. फरीद साहेब त्या फकीरास समजावू लागले की,''हे बघ प्रिय मित्रा, तू गोधडीला शिलाईचे टाके घालत बसला आहेस, काय कधी या जीवनासदेखील कधी मेख (खुंटी) लावली आहेस का? या देहात बसून कधी ध्यान व नामस्मरण केले आहेस? इथे कोणी रिद्धी-सिद्धी प्राप्त असलेला मनुष्यही सदैव राहात नाही आणि हातचलाखी व जादू करणारा मनुष्यदेखील सदैव राहात नाही, सर्व हा संसार सोडून निघून जातील.''

फरीदा दोंह दीवीं बलंदयां मलक बहिठा आय।।
गढ़ लीता घट लुट्टया दीवड़े गया बुझाय।।

त्या गोधडी शिवत बसलेल्या फकीराने प्रश्न विचारला की, ''काय हे सत्य आहे की काळ आपण पाहत असताच आपणांस घेऊन जातो का तो लपून नकळत येऊन मारतो?'' फरीद साहेबांनी उत्तर दिले, ''प्रिय मित्रा, त्यावेळी चंद्र आणि सूर्य हे दोन्ही दीपक प्रज्वलित होतील, तुझ्या दोन्ही डोळ्यांदेखत तो यमदूत येईल, या शरीरावर कब्जा करेल व दोन्ही नेत्रांना विझवून जाईल. मग हे नेत्र संसार पाहू शकणार नाहीत. तो लपत नाही कारण त्यास कोणाचीही भीती नाही.''

फरीदा वेख कपाहै जे थीआ जे सिर थीआ तिलाह।
कमादै अर कागदै कुंने कोयलिआह्।।

महात्मांचे अंतर्यातील नेत्र उघडलेले असतात. त्यांना अनेक जन्मांचे ज्ञान असते की आपण कोणत्या जन्मी काय होतो, आपण कसे पशु-पक्षांच्या योनीत आलो, आपण किती पत्न्या आणि किती पती बनविले. त्या फकीराने पुन्हा प्रश्न विचारला,''काय परमात्म्याच्या दरबारात कष्ट सहन करावे लागतात.'' फरीद साहेब त्यास म्हणाले, ''तू स्वत:च्या डोळ्यांनी या संसारात पाहातोस की ऊसात देखील आत्मा आहे. परंतु त्याची काय दुर्दशा

होते ती पाहा! शेतकरी अगोदर त्यास कापतो, मग तासून त्यास सोलतो व नंतर त्यास गुऱ्हाळ्यात घालून त्याचा रस काढतो. त्यास किती त्रास होत असावा? त्यानंतर ऊसाच्या राहिलेल्या चोथ्याला देखील आगीत घालून जाळले जाते. ऊसाचा रसदेखील कसा उकळला जातो. गोड साखर बनण्यासाठी त्यास किती कष्ट सोसावे लागतात? तत्पूर्वी एकेकाळी तो एखादा चांगला मनुष्य असण्याचीदेखील शक्यता असते.''

त्याचप्रमाणे कपडा बनण्यासाठी कापसाला किती तहान-भूक सहन करावी लागते, मग त्यास कातण्यासाठी मशिनमध्ये घातले जाते, पिंजाऱ्याच्या पिंजण्याचे व बडविण्याचे आघात त्यास सोसावे लागतात. शेवटी शिंप्याकडे आल्यावर त्यास कातरले जाताना वेदना सहन कराव्या लागतात. तोदेखील कधी एके काळी चांगला आत्मा असू शकतो.

एखाद्या घड्याची दुर्दशा पाहा, घडा बनण्यासाठी त्यास किती त्रास सहन करावे लागतात. अगोदर कुंभार माती तिंबतो, त्यास कुंभाराच्या चाकावर ठेवून गोल फिरवितो. त्यास दोरीने कापतो व मग आगीचा धाग देऊन त्यास परिपक्व बनवितो. या सर्व वस्तूंमध्ये जीवात्मा असतो. त्या सर्वांना या गोष्टीचे ज्ञान असते. परंतु आपणांस वाटते की, या गोष्टी अशाच बनलेल्या आहेत. जेव्हा आपण अंतर्यात जातो तेव्हा आपणांस या गोष्टींचे ज्ञान प्राप्त होते. ज्यांनी परमात्म्याची भक्ती केली नाही, मनुष्य जन्माची किंमत ओळखली नाही, त्यांची अशी दुर्दशा झाली.

जेव्हा मी बाबा बिशनदासजींना महाराज सावन सिंहजींकडे घेऊन गेलो तेव्हा त्यांच्या सोबत फत्ती फकीर देखील होता. फत्ती फकीर देखील त्याच गावचा गावकरी होता, जिथे बाबा बिशनदासजी राहात असत. फत्ती फकीराची अंतर्यात प्रगती होती. जेव्हा महाराज सावन सिंहजींशी भेट झाली तेव्हा फत्ती फकीराने बसल्या-बसल्या सांगितले की, आपला एक जन्म राजा फरीदकोटचादेखील झालेला आहे. महाराज सावन सिंहजी त्यास हसून

म्हणाले, मी अनेक जन्मांमध्ये अत्यंत गरीबी देखील पाहिली आहे. आज जर का मी त्या राजवाड्यांवर मालकी हक्क दाखविण्याचा प्रयत्न केला तर काय ते मला त्या राजवाड्यांमध्ये घुसून तरी देतील का? महात्मांना खूप आंतरीक अनुभव असतो. परंतु ते स्वत:स लपवून ठेवतात.

मंदे अमल करेंदया ऐह सजाय तिनाह।।

आपण सांगता की कोळशाची काय दुर्दषा होते? अगोदर कोळशास जाळले जाते, मग त्यावर पाणी घालून विझविले जाते. अशाप्रकारे कोळशास किती कष्ट सोसावे लागतात. ज्याप्रमाणे हात भाजल्यानंतर त्यावर पाणी घातल्यास किती त्रास होतो. पुन्हा लोक कोळशास विस्तवात जाळतात. या संसारात जे जीव ध्यान–नामस्मरण करीत नाहीत, मनाच्या सांगण्यानुसार दुष्कर्म व पाप करतात, ते जीव अशा योनींमध्ये येऊन अशी सजा भोगतात.

फरीदा कंन मुसल्ला सूफ गल दिल काती गुड़ वात।
बाहर दिसै चानणा दिल अंधिआरी रात।।

एक ढोंगी साधू ज्ञान व ध्यानाविषयी सांगत होता. फरीद साहेब त्यास म्हणाले की, तू ध्यान करण्याचा कपडा खांद्यावर ओढलेला आहेस. परंतु हृदयात लोकांचे खिसे कापून पैसे ऐटण्याची योजना आहे. तोंडाने गोड–गोड बोलतोस, बाहेर तुला प्रकाश दिसतो परंतु तुझ्या हृदयात अंध:कार आहे.

दोन मनुष्य खोटे बोलण्यात पारंगत होते. त्यांनी आपसांत चर्चा केली की, संसाराची फसवणूक करून त्यास कसे लुबाडले जाऊ शकते? त्यांना वाटले हे तर फार सोपे आहे. त्यांनी आपसांत ठरविले की, आपण एकमेकांच्या खोट्या गोष्टींना सत्य सिद्ध करू. तू माझा साक्षी व मी तुझा साक्षी. ते दोघे राजाकडे गेले. त्यांनी जाऊन राजाला सांगितले की,''आम्ही दोघांनी परमार्थात खूप प्रगती केलेली आहे, आम्हांस त्रिलोकापर्यंत सर्वकाही दिसते. आमच्या सारखा महान इतर कोणीही नाही. अगोदर आम्ही शिकार करीत होतो.''

राजाने त्यांस विचारले की, ''एखाद्या केलेल्या करामतीचे वर्णन करून सांगा की, तुम्ही शिकार करताना काय मारले?'' त्यातील एक म्हणाला, ''हा दुसरा मनुष्य शिकार करण्यात फारच पारंगत आहे. याने एके दिवशी एका हरिणास बाण मारला आणि केवळ एकाच बाणाने हरिणाचे पाय, कान व शिंग या तिन्ही इंद्रियात छेद केला.'' राजा म्हणाला, ''हे तर साफ खोटे आहे. हरिणाचा पाय कुठे असतो? कान कुठे असतो? व शिंग कुठे असते?'' त्यावर तो उत्तरला, ''हा धनुर्विद्येत निपुण आहे, याचा नेम फारच अचूक आहे. जेव्हा याने बाण मारला त्यावेळी हरीण आपल्या पायाने कान खाजवत होते व त्यावेळी पाय, कान व शिंग एकेजागी होते.'' ते सर्व साफ खोटे होते, परंतु त्यांनी ते सत्य सिद्ध केले.

मग राजाने दुसऱ्या माणसास विचारले तेव्हा तो म्हणाला, ''एके दिवशी झाडावर कबुतर बसले होते. मी गोफणाने कबुतरास मारले. तेव्हा कबुतर भाजून खाली पडले. मला त्यास शिजविण्याची गरज भासली नाही.'' राजा म्हणाला, ''हे कसे शक्य आहे? केवळ गोफणाने मारल्यावर कबुतराचे मांस शिजून त्याचा कबाब बनला! त्यास शिजविण्यासाठी आगीवर ठेवावेच लागले नाही?'' दुसऱ्या माणसाने म्हटले, ''महाराज, हा खूप मोठा नेमबाज आहे. कबुतराने दगड खाल्ले होते. जेव्हा त्यास गोफणातील दगड लागला तेव्हा दगडांच्या घर्षणाने आग निर्माण झाली आणि कबुतर शिजून खाली आले.'' हेदेखील धडधडीत असत्य होते. परंतु ते खोटे बोलण्यात निपुण होते, त्यांनी हे खोटेदेखील सत्य सिद्ध केले. पल्टू साहेब सांगतात :

जिसके साथ दस-बीस हैं उसका नाम महंत।

अशी लोकं एकत्रित होऊन आपली पार्टी बनवितात, त्यांच्या सोबत आयत्या पिठावर रेघोट्या मारणारे, हलवा-पुरी फुकट खाणारे असतात. ते अशा खोट्यास खरे बनवितात की या महात्म्यास खूप काही दिसते, डोळे बंद केल्यास त्रिलोकापर्यंत दिसते. याने अंतर्यात फार प्रगती केलेली आहे.

गुरु नानकदेवजी कुरुक्षेत्रात गेले असता त्यांनी पाहिले की, तेथे एक मनुष्य कधी डोळे उघडत असे तर कधी डोळे बंद करत असे. त्याने स्वत:पुढे एक लोटा ठेवला होता, ज्यात माया (पैसे) ठेवलेली होती. गुरु नानकदेवजींनी बाला व मर्दानाला सांगितले की, हा साफ ढोंगी साधू आहे. हा ध्यानात बसूनही सतत डोळे उघडून पाहातो आहे की लोट्यात किती माया जमा झालेली आहे? आणि डोळे यासाठी बंद करतो की लोकांना वाटावे की हा बाबा समाधी धारण करून बसलेला आहे. लोकं त्याची खूप प्रशंसा करीत असत की, याची अंतरदृष्टी त्रिलोकापर्यंत आहे.

गुरु नानकदेवजींनी बालास सांगितले की, तू याचा लोटा उचल व त्याच्याच मागे नेऊन ठेव आणि ते स्वत: त्याच्यासमोर हात जोडून बसले. जेव्हा त्याने डोळे उघडून पाहिले की समोरचा लोटा नाहीसा झाला तेव्हा संतापाने त्याचा तिळपापड झाला. तो गुरु नानकदेवजींच्या मागेच लागला की आपण माझा पैशांचा लोटा उचलला आहे. ते हसून म्हणाले:

काल नाहीं जोग नाहीं, नाहीं सत के ढब।
मगर पीछे कछु न दिसे, सुई ते तिन लोए।।

गुरु नानकदेवजींनी सांगितले की, ''तू कान व नाक पकडून योगसाधना केल्याचे ढोंग करून लोकांची फसवणूक करण्यासाठी त्यांना खोटं सांगतोस की, तुला अंतर्यात त्रिलोकापर्यंत दिसते व तुला आपल्या स्वत:च्या पाठी ठेवलेला लोटा दिसत नाही?'' तेव्हा तो लज्जित झाला.

परमेश्वराचे प्रिय संत–महात्मा आपणांस समजावतात की, असा साधू तोंडाने गोड–गोड गोष्टी करतो, परंतु लोकांचे खिसे कापण्यासाठी त्याने हातात कातर धरलेली असते. तो प्रत्येक अयोग्य व अनुचित काम करण्यासाठी तयारच असतो. त्याच्या हृदयात अंध:कार असतो व त्यास बाहेर प्रकाश दिसतो. म्हणून महात्मा प्रेमाने समजावतात की साधू जसा बाह्यस्वरूपात असतो तसाच अंतरात असावा व त्याच्या अंतरात जे असते तेच बाहेर यावे,

तेच त्याच्या मुखातून बाहेर पडावे. आपण बाहेरून संसाराची फसवणूक करू शकतो. परंतु परमात्मा अंतर्यात बसलेला आहे, त्याची कधीही फसवणूक केली जाऊ शकत नाही.

मिस्टर ऑबेरॉयनी इंग्रजी भाषेत एक पुस्तक लिहिलेले आहे. त्यातील एका अध्यायात सुंदरदास नामक महाराज सावन सिंहजींच्या एका नामधारक शिष्याचा उल्लेख येतो. त्याने खूप नामाची साधना केलेली होती. तो माझ्यासोबत आठ–आठ तास ध्यान–अभ्यासात बसत असे. एके रात्री आम्ही आमच्या शेतातच शेकोटी पेटवून ध्यानास बसलो होतो की जेणेकरून थंडीसाठी अंगावर कपडा ओढावा लागू नये. शेकोटीतील एक जळते लाकूड त्याच्या मांडीवर येऊन पडले व त्याच्या एका पायाचा पुढचा भाग भाजून गेला, परंतु त्यास कळलेच नाही. जेव्हा आम्ही ध्यानातून उठलो, मी त्याचा पाय पाहून खूप चिंतीत झालो, परंतु तो म्हणाला जितका ध्यान–अभ्यासात आज रस आला, तितका रस आजपर्यंत कधीच आला नव्हता.

सर्वप्रथम आम्ही त्यास आमच्या जवळ रहाणारे डॉक्टर कपूर सिंहांकडे घेऊन गेलो असता, तो म्हणाला याचा पाय कापावा लागेल. आम्हांस ते ऐकून खूप वाईट वाटले. आम्ही जेव्हाही स्मरण करीत असे, आमचे सतगुरू महाराज कृपाल सिंहजी आम्हांस भेटण्यास येत असत. परमेश्वर कृपेने ते आम्हांस भेटण्यासाठी आले. त्यांना आम्ही त्याचा पाय दाखविला. ते म्हणाले, पाय कापण्याची गरज नाही. फक्त रोज कडूलिंबाच्या पाण्यात धूवून हळदीचा लेप लावा, पाय बरा होईल. त्याचा पाय लवकर बरा झाला.

त्यावेळी सुंदरदासाने महाराज कृपालजींना बरेच प्रश्न केले की,''जे ढोंग धारण करून गुरू बनतात व लोकांची फसवणूक करून त्यांस लुबाडतात त्यांना त्याकर्माची शिक्षा मिळते का?'' तेव्हा महाराज कृपाल म्हणाले,''हे बघ सुंदरदास, मी जर का तुला केवळ सांगितले तर ही इथे बसलेली इतर माणसे म्हणतील हे महाराज स्वत:चेच काहीतरी सांगत आहेत, महाराजजी असा उपदेश करीतच असतात. तू आपले डोळे बंद कर व जे काही अंतर्यात पाहशील त्याचे स्वत:च वर्णन करून सांग.''महाराजजींनी त्याचे डोळे बऱ्याच वेळा बंद केले व पुन्हा उघडले. त्याने वर्णन करून सांगितले की किती ढोंगी गुरू बनलेले आहेत व त्यांस कोणत्या शिक्षा दिल्या जात आहेत. कशाप्रकारे त्यांना गुराळ्यात चिरडून त्यांचे रक्त काढले जात आहे, कशाप्रकारे त्यांना निरनिराळे हिंस्र पशू खात आहेत. म्हणून महात्मा आपणांस येऊन प्रेमाने समजावतात की कोणाच्याही आत्म्यास धोका देण्यापेक्षा व त्याची अशी फसवणूक करण्यापेक्षा मोठा दुसरा गुन्हा नाही. 'आत्मघाती महापापी'.

परमात्मा कृपाल सांगत असत, ''नि:संदेह परमात्मा उच्च आहे, सत्यदेखील उच्च आहे, परंतु सत्याचे आचरण ठेवणे त्याहूनही उच्च आहे.'' फरीद साहेब सांगतात, ''तुम्ही सच्चे बना, निर्मळ बना, शब्द-नामाची कमाई करा की जेणेकरून परमात्मा आपला खरेपणा पाहून दरवाजा उघडेल.''

***



प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे,
सांपला, हरियाणा – १० डिसेंबर १९९६

एक प्रेमी :– काय आपण गुरूंच्या दयेविषयी काही सांगाल का?

बाबाजी :– संतमतात गुरूंच्या दयेबद्दलच सांगितले जाते. आपण सगळे सत्संगात बसता आणि ध्यान अभ्यासात बसण्यापूर्वी देखील जे थोडेफार बोलले जाते, त्यावेळी आपल्या मनास हजर ठेवून समजण्याचा प्रयत्न करा. काही प्रेमी दर्शनाच्यावेळी भेटण्यास येतात तेव्हा म्हणतात की आमच्याकडे सांगण्यासारखे काही नाही व तुम्ही देखील सत्संगात खूप काही सांगितलेले आहे, आता आम्ही फक्त दर्शनासाठी आलो आहोत. जे प्रेमी सत्संगात आपल्या मनास हजर ठेवत नाहीत तेच प्रेमी असा प्रश्न विचारतात.

मी गुरूंच्या दयेबद्दल नेहमीच सांगत असतो की गुरू मोबदला न घेणारे आपले बिनपगारी नोकर असतात. ते आपले असे नोकर असतात जे आपली सेवा करताना कधी कंटाळत नाहीत, कधी थकत नाहीत व कधी आपल्यावर उपकार करीत नाहीत. ते आपले कर्तव्य पालन करीत असतात. ते आपले अंगण साफ करण्यासाठी झाडू काढताना देखील आपल्याकडून काही आशा अपेक्षा ठेवत नाहीत. कित्येकदा घाण खरवडून देखील काढावी लागते, परंतु जेव्हा गुरू ती घाण खरवडू लागतात तेव्हा सेवक तक्रारपण करतो की माझ्याबाबतीतच असे का होते? खरे तर संत आपल्या दयेचा वर्षाव करणे कधी सोडत नाहीत.

सर्वसाधारणपणे संत सेवकांना वचनांद्वारेच समजवतात. सत्संगात संत एकच शब्द पुन्हा पुन्हा समजवतात. गोष्टीतर केवळ त्याच तीन–चार आहेत की नामस्मरण करणे, अंतर्यात शब्द ऐकणे व आपल्या खऱ्या घरी सचखंडात पोहचणे. संत कधी यारितीने तर कधी त्यारितीने समजवतात की कोणतातरी शब्द ह्याच्या मनाला आवडेल, ह्याच्या मनात परिवर्तन आणेल.

तुलसीसाहेब म्हणतात की, ''संत सच्चखंडातून सेवकासाठी मेवा घेऊन येतात. बरीचशी लोकं त्या मेव्याचे गिऱ्हाईक बनून येतात, परंतु संत जेव्हा त्या मेव्याची किंमत सांगतात तेव्हा कोणीही जवळ येत नाहीत, सर्व म्हणतात की हे खूप महाग माल विकतात.'' संत विचारतात काय तू आपले शीर देण्यास तयार आहेस? खरं विचाराल तर संतांना ना कोणाचे शरीर हवे असते, ना कोणाचे धन हवे असते व ना कोणाचे शीर हवे असते. उलट संत सदैव जीवन देण्यासाठीच येतात.

संतांची सर्वांत मोठी दया ही आहे की, ते आपल्याला सत्संगाद्वारे अंतर्यात घेऊन जातात. जो आत्मा अंतर्यात जातो त्यास माहीत असते की सतगुरू अंतर्यात खालच्या मंडळात सत्संग ऐकावतात आणि शब्दाशी जोडतात. सुरवातीला आपण नामस्मरणाद्वारे गुरूंच्या आकर्षक कक्षेत जातो. पुढे गुरू आपल्याला शब्दरूपात भेटतात. तेथे गुरू आपणांस शब्दरूप नामाशी जोडतात. संत्संग ऐकवितात आणि अंतर्यातील मंडळांबद्दल सांगतात कि कुठल्या मंडळातून जायचे व कुठल्या मंडळात जाऊ नये.

आमचे आई–वडील आम्हाला पऱ्यांच्या गोष्टी सांगत असत. ही सर्व अंतर्यातील मंडळांच्या गोष्टी आहेत. आजदेखील जे अभ्यासी स्वर्गातून जातात त्यांना माहीत आहे की तेथे सर्व वस्तू उपस्थित असतात. पण जेव्हा ते नरकांच्या मंडळात येतात तेव्हा ते तेथेही पाहतात की कशाप्रकारे जीव किंचाळत–आक्रोश करत आहेत, तेथे त्यांना शिक्षा मिळत आहेत. आज संसारात स्थिती काही निराळीच आहे, गोष्टी करणारे खूप आहेत.

आपण संतांना देखील अशा गोष्टी सांगतो की परमात्मा तर डरपोक व भ्याड लोकांसाठी आहे, परमात्मा तर अस्तित्वातच नाही. संत म्हणतात की परमात्मा तर आहे, परंतु परमात्म्याला पाहू शकणारे आपले नेत्र नाहीत. आपण ह्या बाह्य संसारात सुद्धा समजू शकतो की कोणती ताकद मृत्यु व



उत्पत्तीचे कार्य करते? कोणती ताकद आहे ज्यामुळे सूर्य उगवतो व अस्त होतो? तो कोणता अक्ष आहे ज्याच्या बाजूला धरती फिरत आहे? ती अशी कोणती ताकद आहे ज्यामुळे झोप येते व मग मनुष्य पुन्हा जागा होतो? संत म्हणतात, इतका मोठा संसार बनवून त्यास परमात्म्याने निराधार आणि रिकामा सोडले नाही. कोणीतरी या संसारास बनविणारा व चालविणारा देखील आहे. मग त्यास आपण निसर्ग म्हणा, परमेश्वर म्हणा किंवा इतर कुठल्याही नावाने संबोधित करा. कोणास वाटते की मी आजारी पडून त्रास घेत फिरावे. कोणाच्या मनात इच्छा उत्पन्न होते की मी लुळा-लंगडा होऊन धक्के खात फिरावे? अशीपण काही लोकं आहेत की ते रडत-तळमळत असतात, आजारपणाचे हिशोब चुकता करीत असतात. कुणाच्या शरीरातून जर पू वाहत असला तर कोणी त्यास आपल्याजवळ उभे करीत नाही. काही अशीपण माणसे आहेत जे चांगल्या महालात राहतात. ह्या सर्व रचनेच्या मागे एखादी गुप्त ताकद आहे. गुरू नानकदेवजी महाराज म्हणतात:

आपे भांडे साजयन आपे पूर्ण करे । इक निहाली पे सबन ईक ऊपर रहण खड़े ।
ईक नी दुध समाईऐ ईक चूल्हे रहण चढ़े । तिन्हां सँवारे नानका जिनको नदर करे ।।

परमात्मा स्वत:च देहांस घडवितो आणि स्वत:च त्यात आत्मा ठेवतो. परमात्मा आपल्यावर दया करून सर्वप्रथम आपणांस संगतमध्ये आणतो, गुरूंच्या सान्निध्यात आणतो. गुरू आपल्यावर दया करून आपल्याला नामाचा अनमोल हिरा देतात आणि परमात्म्याचे रहस्य सांगतात. स्वत: मार्गदर्शक

बनून अंतर्यातील मंडळांत आपले मार्गदर्शन करून आपणांस पुढे परमात्म्याच्या दरबारात घेऊन जातात. गुरूंच्या दयेचे वर्णन केले जाऊ शकत नाही. गुरू नानक देवजी महाराज म्हणतात:

सतगुरू दया का रूप है, जिसनूं दया दया सदा होए ।

गुरूंच्या दयेचे शब्दांत वर्णन केले जाऊ शकत नाही. ज्याला दयेचा एक तणिक देखील मिळतो किंवा त्याचा एक कण जरी प्राप्त होतो तेव्हा त्याचे हृदय प्रफुल्लीत होते की माझ्यावर किती दया झाली!

मी आशा करतो की सर्व प्रेमींनी थोडीशी हिंमत करावी. संत काही मोठी वचने देत नाहीत. जेव्हा आपण परमार्थ मार्गाचा विसर पडलेले जीव तयार होत नाही. तेव्हा संत आपल्या कथा व गोष्टींद्वारे समजवतात. संत म्हणतात की या चला सत्याला स्वत:च्या डोळ्यांनी पहा.

महाराज कृपाल म्हणत असत 'जे काम एक मनुष्य करू शकतो तेच काम दुसरा देखील करू शकतो. मी नेहमी सांगत असतो. प्रियजनहो, हा गोष्टी किंवा कथन करण्याचा विषय नाही. हा तर करणीचा (स्वत: ध्यान–अभ्यास करण्याचा) विषय आहे. मी स्वत: माझ्या आयुष्यात केले आहे. मला माहीत आहे की संत सत्य दर्शवण्यासाठीच येतात, परंतु आपण परमार्थ मार्गाचा विसर पडलेले जीव ह्या सत्यास बघायला तयार नसतात.

***

संतबानी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान येथील कार्यक्रम

३१ मार्च ते २ एप्रिल २०१५

दिल्ली शहरातील कार्यक्रम

२२ ते २४ मे २०१५

कम्युनिटी हॉल, भेरा एन्क्लेव, पश्चिम विहार, नवी दिल्ली – ११० ०८७

(मो.: ९८१०२१२१३८, ९८१०७९४५९७, ९८१८२०१९९९)

भजन गाण्याचे महत्व

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींना भजने गाण्याविषयी दिलेला संदेश, मुंबई, महाराष्ट्र - १९९७

मेरा कागज गुनाह वाला पाड़ दे ।

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार आहे, ज्यांनी आपल्या आठवणीत बसण्याची आणि आपले गुणगान करण्याची संधी दिली. संतांचा इतिहास वाचून कळते की संतांचे लहान मुलांबरोबर फार प्रेम असते, कारण लहान मुलांचा आत्मा फार भोळा असतो. त्यांच्या आत्म्यावर (सांसारीक गोष्टींचा) मळ चढलेला नसतो. आपण जसजसे मोठे होत जातो, तसतसे आपल्यावर जास्त मळ चढत जातो.

मला दोन महान संतांच्या चरणी बसण्याची संधी मिळाली आहे, ही त्यांचीच दया होती. महाराजजी सांगत असत,''आंधळ्या व्यक्तीत ही क्षमता नसते की तो स्वत:हून डोळस माणसास पकडू शकेल. जोपर्यंत डोळस मनुष्य दया करून आपले बोट आंधळ्या व्यक्तीच्या हातात देत नाही, तोपर्यंत आंधळा डोळस व्यक्तीस पकडू (भेटू) शकत नाही.'' या दोन्ही महान संतांचे लहान मुलांवर फार प्रेम होते. जे काम आई-वडील करू शकत नाहीत, जसे अंतर्यात लक्ष एकाग्र करणे किंवा अंतर्यात गुरूंचे दर्शन करणे, लहान मुले गुरूंना अंतर्यात प्रकट करू शकतात. आपल्याला अशी बरीचशी लहान मुले भेटतील जी गुरूंकडून परस्पर संदेश घेतात.

महाराजजी सांगत असत की, अध्यात्मिक प्रगतीसाठी शिष्यास चाळीस दिवसांच्या लहान बाळाप्रमाणे बनावे लागते. एम.ए.पास व्यक्तीस अशिक्षित बनावे लागते. लहान मुल जेव्हा शाळेत प्रवेश करते तेव्हा त्याला माहीत नसते की माझ्या शिक्षकात कोण-कोणते गुण आहेत? हे मला काय सांगतील? किंवा जे सांगतील त्यात माझा किती फायदा असेल?

आपण जाणता की शिक्षक मुलाची मदत करतात, परंतु पेपर तर मुलांनाच लिहावा लागतो. जो मुलगा जास्त मेहनत करतो, तो शिक्षकाचे लक्ष जास्तीत जास्त वेधून घेण्याचा अधिकारी असतो. हेच कारण असते की सर्व मुलांचे पेपर एकसारखे नसतात, प्रत्येकाला एकसमान मार्क मिळत नाहीत. हे प्रत्येक मुलाच्या आपआपल्या मेहनतीवर व अभ्यासातील निमग्नतेवर अवलंबून असते. शिक्षक तर सर्वांना एकाच निमग्नतेने शिकवितात.

संतमतातदेखील हीच गोष्ट लागू होते की सेवक जितक्या जास्त निमग्नतेने परिश्रम करतो, तितकीच तो गुरूंची दया जास्त प्राप्त करण्याचा अधिकारी बनतो. गुरू तर सर्वांवर एकसारखीच दया करतात, सर्वांवर एकसमान ध्यान देतात, परंतु ध्यान ग्रहण करणारे शिष्य लवकर अंतर्यात प्रगती करतात. आपण परिश्रम करण्यात आपले अंग चोरतो, आपण आळशी आहोत. आपले पारमार्थीक ध्येय गाठण्यास आपण जितका अधिक वेळ दवडत आहोत, तितकेच सुख-शांती पासून व आपल्या खऱ्या घरापासून (सचखंडापासून) आपण दूरावत आहोत.

प्रियजनहो, मार्ग दर्शविणाऱ्याने आपल्यावर दया केली की आपल्याला योग्य व सरळ मार्ग दर्शविला आणि सोबत त्यांनी आपल्याला हे वचन देखील दिले की मी तुझ्यासोबत येतो, परंतु आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न तर आपणांसच करावे लागतात. संतांनी आपल्यावर दया केली, ह्या आत्मारूपी राजकुमारीस तिच्या खऱ्या घराचा विसर पडला होता, त्या राजकुमारीला आपल्या घराचा मार्ग दर्शविला. जे अंतर्यात जातात त्यांना माहित असते की गुरू प्रत्येक मंडळात आपल्यासोबत असतात, परंतु रस्ता तर आत्म्याला स्वत:च पार करावा लागतो.

बंधु-भगिनींनो आज मुलं पहिले भजन म्हणतील, काही खरी लहान मुलं आहेत तर काही लहान मुलं बनलेली आहेत, आम्हाला दोन्ही प्रिय आहेत. मुलांसारखे मन बनविणे सोपे काम नसते.

***